घनपारायण काळ :
११ जून ते १६ ऑगस्ट २०२२
दररोज
सकाळी ७.३० ते १२.३०

श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती सेवामंडळ
श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्त्रबुद्धे समाधिमंदिर, पुणे आणि
श्रीनृसिंहसरस्वती पाठशाळा आळंदी

घनपारायण स्थळ :
श्रीसिद्धिविनायक मोदी गणपती
मंदिर, नारायण पेठ, पुणे

# मुखोद्गत सदशग्रंथ घनपारायण विशेषांक

जून २०२२ | विशेषांक | खासगी वितरणासाठी | पाने ४



*पारायणकर्ते वे.मू. अथर्व संजय पटवर्धन आणि श्रवणकर्ते वे.मू. स्वानंद धायगुडेगुरुजी*

श्रीनृसिंहसरस्वती वेदपाठशाळा, आळंदी यांचे विद्यार्थी वे.मू. अथर्व संजय पटवर्धन यांच्या 'मुखोद्गत सदशग्रंथ घनपारायणा'च्या कार्यक्रमाचा शुभारंभ शनिवार, दि. ११ जून २०२२ रोजी, श्रीसिद्धिविनायक मोदी गणपती मंदिर, नारायण पेठ, पुणे येथे वे.मू. दिनकरभट्ट फडकेगुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. ११ जून २०२२ ते १६ ऑगस्ट २०२२ या कालावधीत रोज सकाळी ७.३० ते १२.३० या काळात होणाऱ्या या पारायणासाठी पारायणी वे.मू. अथर्व पटवर्धन यांना शुभेच्छा आणि शुभाशीर्वाद देण्यासाठी अनेक मान्यवर वैदिक, विद्यार्थी आणि अनेक वेदाभिमानी उपस्थित होते.

अध्यक्ष वे.मू. दिनकरभट्ट फडके आणि प्रमुख पाहुणे श्री. अशोकराव जोशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यावर वे.मू. मधूर लंगरे आणि ब्रह्मवृंदाने ईशस्तवन केले. वे.मू. वसंतराव फडकेगुरुजी यांनी मा. अध्यक्ष, प्रमुख पाहुणे श्री. अशोकराव जोशी आणि मोदी गणपती मंदिराचे मालक आणि विश्वस्त श्री. शेखर आणि धनंजय भट यांचे श्रीफल, पुष्पगुच्छ आणि वस्त्र देऊन स्वागत केले.

आपल्या प्रास्ताविक भाषणात वे.मू. योगेश्वर बोरकरगुरुजी म्हणाले, ''वेदाऽखिलो धर्ममूलम्।'' अनादी आणि अपौरुषेय असलेल्या वेदांचे संरक्षण, संवर्धन व्हावे या हेतूने प.प. विठ्ठलपंत बोरकरगुरुजी आणि वेदवेदांगचक्रवर्ती किंजवडेकरगुरुजी यांच्या प्रेरणेने तीस वर्षांपूर्वी म्हणजे १९९२ साली किंजवडेकरगुरुजींच्या उपस्थितीत वसंतराव फडके गुरुजींच्या घरी या पाठशाळेचा श्रीगणेशा झाला आणि अव्याहतपणे वेदाध्यापनाचे कार्य सुरू असल्यामुळे, ही पाठशाळा काही वर्षांतच नावारूपास आली. पाठशाळा स्थापन झाल्यापासून आजच्या दिवसापर्यंत श्रीसहस्रबुद्धे समाधिमंदिराचे श्री. अशोककाका जोशी आणि नृसिंहसरस्वती मठाचे या पाठशाळेला अमूल्य सहकार्य लाभलेले आहे. सांप्रत कालामध्ये पाठशाळेतून उत्तमोत्तम वैदिक विद्वान उच्चविद्याविभूषित होऊन स्वत:चे व पाठशाळेचे नाव उज्ज्वल करीत आहेत. प.पू. गुरुजींच्या तपस्येचे हे फळ आहे.

'इवलेसे रोप लावियले द्वारी । त्याचा वेलू गेला गगनावेरी ।
वेदाध्ययन करणाऱ्यांची संख्या वाढत आहे हे निदर्शनास आल्यावर



*वे.मू.दिनकरभट्ट फडके यांचा सत्कार वे.मू. वसंतराव फडकेगुरुजींच्या हस्ते*



अगजाननपद्मार्कं गजाननमहर्निशम् । अनेकदंतं भक्तानां एकदंतं उपास्महे ।।

आळंदी येथे श्रीनृसिंहसरस्वती मठात ‘श्रीनृसिंहसरस्वती पाठशाळा’ या नावाने वसंतराव फडकेगुरुजींनी ‘पुनश्च हरिओम’ केले. जवळजवळ १२ वर्षे मठाच्या वास्तूत अध्यापन सुरू होते. मठानेही कोणती अभिलाषा न बाळगता पाठशाळेला जागा उपलब्ध करून दिली. पाठशाळेची स्वत:ची अशी सर्व सोयींनी सुसज्ज इमारत असावी असा गुरुजींचा मानस होता. ‘अनंत हस्ते कमलावराने । देता किती घेशील दो कराने।’ असे गुरुजी म्हणत असत. नवीन वास्तू तयार होण्यासाठी गुरुजींनी अथक परिश्रम घेऊन, वेदाध्यापनाकडे दुर्लक्ष न करता, लोकाश्रयावर पाठशाळेला सुसज्ज इमारत उभी करून दिली. गुरुजींचे सहाध्यायी वे.मू. पुरुषोत्तम उपाध्येगुरुजी यांनीही पाठशाळेत अध्यापनाच्या कामी अमूल्य सहकार्य केले. आजवर शाळेत २० घनान्त आणि २५ क्रमान्त तसेच शेकडो विद्यार्थी संहिता व शाखाध्ययन करून गेले आहेत. त्यापैकी चार विद्यार्थ्यांनी कंठस्थ घनपारायण केले आहे. सांप्रतचे हे पाचवे घनपारायण आहे. योगायोगाने ते सर्व जण या कार्यक्रमाला उपस्थित आहेत.

विद्यमान परिस्थितीत आपल्याच पाठशाळेत अध्ययन केलेले वे.मू. प्रथमेश जोशीगुरुजी पाठशाळेची धुरा समर्थपणे सांभाळत आहेत. त्यांच्याजवळ १५ विद्यार्थ्यांचा घनपाठ पूर्ण झाला आहे ही पाठशाळेसाठी आणि आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

आमच्या शाळेत अध्ययन केलेले वे.मू. घनपाठी अथर्व पटवर्धन हे आज दशग्रंथांसहित घनपारायण सुरू करीत आहेत. याचा आम्हाला अतिशय आनंद होत आहे. असे दशग्रंथांसहित घनपारायण अगदी मोजक्याच लोकांनी केलेले आहे.

वेदचुडामणी, वेदरत्न अशा अनेक उपाधींनी गौरविले गेलेले वे.मू. स्वानंद धायगुडे पारायणाला ‘श्रवणकर्ते’ म्हणून लाभलेले आहेत. ऋग्वेद संहितेचा संपूर्ण घनपाठ, ऐतरेय ब्राह्मण, ऐतरेय अरण्यक, आश्वलायन श्रौतसूत्र, निरुक्त इत्यादी ग्रंथ अतिशय परिश्रमाने मुखोद्गत करून ते सर्वांसमोर ‘स्वकीयमेधाविलासा’ने सादर करणे अतिशय कष्टाचे काम आहे. कंठस्थ घनपारायण करून स्वकीय जीवनाची इतिकर्तव्यता प्राप्त करून घेणे हे विद्यार्थ्याचे स्वप्न असते. ते चि. अथर्व आजपासून सुरू करतो आहे, त्याला आमच्या सर्वांच्या शुभेच्छा!’’

यानंतर वे.मू. प्रथमेश जोशीगुरुजींनी अध्यक्षांचा परिचय करून दिला. ते म्हणाले, ‘‘वे.मू. दिनकरभट्ट फडके यांचे प्रारंभिक वेदाध्ययन वे.मू. किंजवडेकरगुरुजी, वे.मू. पाध्येगुरुजी यांच्याकडे झाल्यावर काशी येथे सांगवेद विद्यालयात वे.मू. बाबागुरू पटवर्धन यांच्याकडे दशग्रंथांसहित घनांत अध्ययन झाले. त्यानंतर काशीचीच अतिशय कठीण अशी सर्वोच्च ‘आजीवन वर्षासन परीक्षा’ उत्तीर्ण होऊन काशीराजांकडून वेदरत्न पदवीसह सुवर्णकंकणाने सन्मान झाला. तसेच वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणे येथे दशग्रंथांसहित घनांत परीक्षा देऊन ‘वेदचूडामणी’ ही पदवी प्राप्त केली. गुरुजींचे म्हणणे एवढे श्रवणीय आहे की तिरुपतीसारख्या देवस्थानांनी त्यांना बोलावून त्यांचे वेदपठण ध्वनिमुद्रित करून जपून ठेवले आहे. गुरुजींना महाराष्ट्र शासनाचा ‘महाकवी कालिदास संस्कृत पुरस्कार’ मिळाला आहे. अनेक ठिकाणी परीक्षकपद, मोठे श्रौत यज्ञ, घनपारायणे यात सहभाग, आणि गुरुजी अध्यापनसुद्धा करतात. त्यांच्याही विद्यार्थ्यांचे घनपारायण याच मंदिरात झालेले आहे.’’

यानंतर गणेशवंदनेने आपल्या अध्यक्षीय भाषणाला सुरुवात करून वे.मू. दिनकरभट्ट फडके म्हणाले की या मोदी गणपती मंदिरात मी लहानपणी राहिलो, खेळलो आहे, त्यामुळे आज ते मंदिर ‘घनपारायणा’साठी प्रसिद्ध होत आहे याचा मला फार आनंद होत आहे. जटा, माला, शिखा, रेखा, ध्वज, दंडो, रथो, घन: अशा अष्ट विकृती आहेत. सुरुवातीला वर्णन केल्याप्रमाणे संहिता, ब्राह्मण, अरण्यक, पद, क्रम हे सगळे मूळ ग्रंथ आहेत. क्रमही मूळ ग्रंथच मानला जातो. दशग्रंथांमध्ये क्रमासकट वेदाची सगळी सहा अंगे मुखोद्गत असणाऱ्याला दशग्रंथी म्हटले जाते. पूर्वी क्रमान्त दशग्रंथ अध्ययन झाले म्हणजे तो मोठा वैदिक झाला असे मानत असत. आणि प्रत्यक्षात तसे होते. नंतरच्या काळात या विकृतीपाठाचा प्रचार, प्रसार जास्त झाला. पूर्वी काशीला वे.मू. काशीनाथभट्ट हर्डीकर होऊन गेले, ते आणि समकालीन जमखिंडीला वे.मू. जोगळेकर म्हणून होते, त्यांचे नाव मी घनपाठी म्हणून ऐकलेले आहे. विशेष म्हणजे जोगळेकरांना टेंबेस्वामींचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद लाभले होते असे माझ्या ऐकिवात आहे. मलकापूरचे वे.मू. महादेवभट्ट पुरोहित यांनी काशीला घनपारायण केलं होतं आणि ते गाजलं होतं. अशी ही परंपरा खूप मोठी आहे व ती पुढेही सुरू राहील. पण सध्याचा काळ जो आहे, तो घनपारायणाच्या दृष्टीने किंवा वैदिक इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा असा आहे असे मलातरी वाटते. कारण, पूर्वी कधीतरी दोन-चार, दहा-पंधरा वर्षांनी एखादे घनपारायण व्हायचे पण या वर्षा-दोन वर्षांत मी पाहतोय, वर्षाला दोन-चार पारायणे होत आहेत. आत्तासुद्धा दोन-चार ठिकाणी पारायणे सुरू आहेत ही आनंदाची गोष्ट आहे.



वे.मू. योगेश्वर बोरकरगुरुजी प्रास्ताविक करताना

पूर्वी येथे गोविंदभट्ट पाठक यांनी पारायण केले होते. पूर्वी कसबा–गणपतीच्या मंदिरात ही पारायणे व्हायची. काशीचे प्रसिद्ध वे.मू. सोमनाथजी सोलापूरकर यांचे क्रमपारायण कसबा–गणपतीत झाले होते. त्यांचा आवाज मोठा होता, तेव्हा रहदारीची वर्दळही कमी होती, त्यामुळे सबंध कसबा पेठ दुमदुमून जायची एवढ्या मोठ्याने ते म्हणत असत. त्यामुळे ते पारायण गाजले होते. तसंच दुसरं गाजलेलं पारायण म्हणजे मोदी गणपतीचे पूर्वीचे पुजारी, वसंतराव फडके यांचे वडील वे.मू. चिंतुनाना फडके यांचे जावई वे.मू. विश्वनाथ देव, आमच्या विद्यासागरचे आजोबा, यांनी केलेलं पारायण! या गणपतीने पुष्कळ घनपारायणे ऐकलेली आहेत. देवगुरुजी यांनी अगदी लहान वयात अतिशय सुश्राव्य पारायण केले होते. पुण्यात पारायणे पुष्कळ झाली पण हे पारायण एवढे गाजले की त्यांची हत्तीवरून शोभायात्रा काढण्याचे ठरले. त्यांना हत्तीवर बसण्याची विनंती करण्यात आली; पण ते म्हणाले, मी हत्तीवर बसणार नाही, तुम्ही वेदांची हत्तीवरून मिरवणूक काढा. त्यानंतर त्यांचे मुंबईला फडके–गणपती मंदिरात आणि नागपूरलाही पारायण झाले.

मध्यंतरी तीस–पस्तीस वर्षांनंतर गोपाळ जोशी यांनी पारायण केले. काही वैदिकांनी दशग्रंथासहित घनाची पारायणे केली आणि ती गाजली. आजचे आपले श्रोते श्री. धायगुडे यांनीही उत्तम पारायण केलेले आहे. अशी ही मोठी परंपरा आहे.

आता मी जे म्हटलं, घन, जटा, माला, रेखा, शिखा या विकृती आहेत. मूळ संहितेला अगर दशग्रंथांना जे महत्त्व आहे, त्यापेक्षा घनाला जास्त महत्त्व आहे हे मान्य आहे. पण काशीला जे षष्ठीपूजन होते, त्या वेळी जो मंत्रजागर व्हायचा, त्या मंत्रजागरामध्ये अशी परंपरा होती की संहिता, क्रम म्हणायचा, पण पदाचं म्हणणं म्हणायचं नाही. कारण पद हे गळांत आहे. तो संपूर्ण ग्रंथ होत नाही. त्यामुळे षष्ठीपूजनात पदाचे म्हणणे होत नसे. पण तो दोष घनात नाही. तेथे गळांत असलेलं सगळं म्हटलं जातं, म्हणून त्याचं विशेष आहे. क्रमामध्ये असं म्हटलं जातं, 'ना रुद्र:क्रमपाठक:।' आपण पुष्कळ प्रयत्न केले तरी क्रमाचं अध्ययन होणं दुरापास्त असतं. कारण असं सांगितलं आहे की त्या विद्यार्थ्याच्या, त्या वैदिकाच्या, त्या ब्राह्मणाच्या शरीरामध्ये थोडासा रुद्राचा अंश असल्याशिवाय तो क्रमपाठी होऊ शकत नाही. तसाच जटा पाठामध्ये काही अंश रुद्राचा असला पाहिजे आणि घनपारायणामध्ये विष्णूचा अंश असला पाहिजे.


डावीकडून – श्री. धनंजय भट, श्री. शेखर भट आणि श्री. अशोकराव जोशी


वे.मू. दिनकरभट्ट फडकेगुरुजी यांचे अध्यक्षीय भाषण

मोदी गणपतीने भरपूर घनपारायणे ऐकली आहेत. ब्रह्मणस्पतीसूक्त घनाचा अभिषेकही मी स्वत: या गणपतीवर केलेला आहे. माझी अशी इच्छा आहे, येथे घनपारायण दोन महिने चालणार आहे, तेव्हा मनात आणले तर येथे घनाचा अभिषेक सहज होऊ शकतो! सकाळची वेळ आहे. गणपतीला संततधार अभिषेकाची सवय आहे. आमच्या वसंतरावांच्या वडिलांनी या मंदिरात पुजारी म्हणून सुरुवात केली त्या वेळी अखंड एकवीस दिवस संततधार, अथर्वशीर्षाचा अभिषेक रघुनाथशास्त्री पटवर्धनांच्या अध्यक्षतेखाली झाला. म्हणजे गणपतीला अभिषेक करून घ्यायची सवय आहे. शंकराला जलधारा प्रिय आहेत. अभिषेकपात्राला दर्भाची मुष्टी अगर दर्भ लावून अन्वारब्ध करता येईल. मी पाहिलेले आहे, काशी–विश्वेश्वराला अभिषेक करताना, ही दक्षिणेतील लोकांची पद्धत आहे, की अभिषेकपात्राला एक दोरी लावून ठेवायची, म्हणजे येथे बसले आहेत आणि तेथे अभिषेक सुरू आहे असे नाही तर अभिषेकपात्राला स्पर्श झाला पाहिजे. बघा जमतं का!

आजचे जे पारायणी आहेत त्यांची काही वैशिष्ट्यं आहेत. जवळजवळ दीडशे वर्षांपूर्वी असा प्रसंग झाला होता, एका ठिकाणी असेच वैदिक जमले होते. पूर्वी गृहस्थ आणि भिक्षुक–गुरुजी वेगळे असा फरक होता. गृहस्थांनाही मूळ ग्रंथ येत असत. अशा एका गृहस्थांच्या घरी कार्यक्रम होता. मंत्रजागर वगैरे झाला. ते वृद्ध यजमान नंतर उठून म्हणाले, माझी एक इच्छा आहे. समोर चौरंगावर एक शालजोडी ठेवलेली आहे. श्रौतसूत्रातील अतिशय कठीण पण अतिशय लहान असा जो अध्याय आहे तो पाठ म्हणेल त्याला ही शालजोडी दिली जाईल.

आमचे किंजवडेकरगुरुजी म्हणायचे, तो अध्याय म्हणजे कोकणातील फुरश्यासारखा (अती जहाल विषारी साप) आहे. चावेल तो मरणारच! अध्याय पाठ असला तरी एवढ्या लोकांसमोर चौरंगावर बसून तो म्हणायचा हे साधं काम नाही. कोणी उठायला तयार नाही! यजमान जे होते त्यांनी षडंग अध्ययन केलेलं होतं. त्यांनाही तो अध्याय येत होता. त्यांनी उगाच काही सांगितलेले नव्हते! या वैदिक क्षेत्रात 'निर्वैर पृथ्वी' असं झालं आहे का? असं एक वृद्ध गृहस्थ बोलले आणि एक परांजपे नावाचे गुरुजी उठले, त्यांनी सर्वांना नमस्कार केला, चौरंगावर बसले, त्या शाली त्यांनी अंगावर पांघरून घेतल्या आणि तो अध्याय अस्खलितपणे म्हणून दाखविला.

ही आठवण मी आज का सांगतोय? आपल्या येथे पटवर्धन पाठशाळेत वेदांगाची परीक्षा होते त्या वेळी एकदा त्यांनी ठरविलं की



वे.मू. स्वानंद धायगुडे यांचे पूजन करताना वे.मू. अथर्व पटवर्धन

जो कोणी तो अध्याय म्हणेल त्याला बक्षीस द्यायचे. त्याही वेळी कोणी उठायला तयार होईना. पण आपले आजचे पारायणी यांनी तो अध्याय पाठ म्हटला! असे आपले आजचे पारायणी आहेत!

मला असं सांगायचं आहे की फक्त घनपाठ, घनपारायण करून भागणार नाही तर आपल्याला वेदांग हे जिवंत ठेवल्याशिवाय वेदपुरुष संपूर्ण होणार नाही. संहिता, जटा, पद, क्रम हा वेदपुरुष झाला, पण त्याची सहाही अंगे जिवंत ठेवण्याकरिता आमच्या पटवर्धन पाठशाळेच्या विश्वस्तांनी खूप परिश्रम केले आहेत. त्या प्रयत्नाचे फळ म्हणून हे पारायणी आहेत. यांनी सबंध उपग्रंथांचं, वेदांगाचं परीक्षा देऊन प्रावीण्य मिळवलेले आहे हे विशेष आहे. पूर्वी असं मानलं जायचं की घनपारायण सुरू आहे म्हणजे ग्रंथांना जरा मालिन्य आलेलं आहे. पण माझ्या माहितीप्रमाणे पटवर्धनगुरुजी उभय घनपाठी आहेत. जसे आजचे श्रोते जे आहेत त्यांनी सर्व वेदांगं तयार ठेवली आहेत, त्याचप्रमाणे पारायणींनीही वेदांगे तयार ठेवली आहेत. आज जरी त्यांना सांगितलं की अमुक खंड तुम्ही म्हणा तरी ते म्हणू शकतात.

या गणपतीच्या देवळात 'गणानांत्वा गणपतीं हवामहे' हे ब्राह्मणाचं खंड सुरू झालं की दुसरं तसंच एक खंड आहे श्रौतामध्ये, पारायणींनी तो म्हटला तर बरं वाटेल, मीही तुमच्याबरोबर म्हणतो! ''

अध्यक्षांच्या विनंतीला मान देऊन पारायणींनी अध्यक्षांसमवेत त्या खंडाचे पठण केले. पठण झाल्यावर अध्यक्षांनी पुढे आपले मार्मिक मत मांडले. ते म्हणाले, 'हे जिवंत ठेवणं कठीण आहे. ''मी म्हटलयं'' असं या क्षेत्रात तरी सांगू नये! एक म्हण आहे, ''माझ्या वडिलांनी खूप तूप खाल्ले आहे, माझ्या हाताचा वास घेऊन पाहा!'' मी म्हटलंय, परीक्षा दिलीय, पारायणे केली आहेत, याला काही महत्त्व नाही! आत्ता काय येतय ते बोला! धायगुडेंनी पारायण करून बरीच वर्षे झाली पण अजूनही त्यांचं सगळं तयार आहे! माझं सगळ्यांना प्रेमाचं सांगणं, बाकी सर्व विसरलात तरी चालेल, पण वेदांगांना विसरू नका, त्यांची आठवण ठेवा! नाव मिळवणं फार कठीण नसतं. नाव मिळविण्यासाठी कष्ट करायला लागतात, त्याच्या काही पटीने प्रयत्न नाव जाऊ नये म्हणून करावे लागतात! अध्ययन करणे हे मोठे पुण्यकर्म आहे, पण ते विसरणे हा मोठा दोष आहे. तेव्हा ते न विसरण्याचा प्रयत्न आजच्या पारायणकर्त्यांनी करावा, आणि ते करतील याची मला खात्री आहे. मी काशीला बरचसं अध्ययन 'पटवर्धन' गुरुजींजवळच केलं आणि आज 'पटवर्धन' पारायणींचा प्रारंभ करायला मला बोलावलेत याचा मला विशेष आनंद वाटतो. मंगलमूर्ती मोरया!'

यानंतर या पारायणाचे 'श्रवणकर्ते' स्वानंद धायगुडेगुरुजींचा परिचय करून देऊन पूजन करण्यात आले. धायगुडेगुरुजींचे क्रमान्त शिक्षण आळंदीला नृसिंह सरस्वती पाठशाळेत वे.मू. वसंतराव फडकेगुरुजी यांच्याकडे झाले. वे.मू. आठल्येगुरुजींकडे जटा, घन आदी विकृतींचे शिक्षण झाले. त्यांच्याच वडिलांकडे षडंगाचे शिक्षण झाले. शाखा झाल्यानंतर त्यांनी काशीच्या राजवाड्यात ३५ वर्षांच्या खंडानंतर शाखा पारायण केले. राजांनी त्यांना सुवर्णांगुली देऊन त्यांचा विशेष सन्मान केला. त्यांनी अनेक पीठांच्या परीक्षा दिल्या असून त्या सर्व पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. त्यांना वेदरत्न, ऋग्वेदचूडामणी, षडंगवित् अशा अनेक पदव्या मिळालेल्या आहेत. त्यांच्या विद्यार्थ्यांनी बेलबागेत घनपारायण केलेले आहे. अनेक ठिकाणी श्रौतयज्ञ, संहिता स्वाहाकार, घनपारायण, वैदिक संमेलने यात सहभाग, आणि ते अध्यापनसुद्धा करतात. शृंगेरी येथे दर वर्षी ते परीक्षक म्हणून जातात. एक आदर्श विद्यार्थी म्हणून गुरुजी नेहमी त्यांचे उदाहरण देतात.

यानंतर पारायणी वे.मू. अथर्व पटवर्धन यांचा परिचय वे.मू. प्रथमेश जोशी यांनी करून दिला.''नवनगर, हुबळी येथे वे.मू. गोपाळ जोशी आणि वे.मू. दत्तात्रेय साधले यांच्याकडे काही दिवस त्यांनी अध्ययन केले. त्यानंतर नृसिंहसरस्वती पाठशाळेत फडकेगुरुजी, उपाध्येगुरुजी आणि वे.मू. प्रथमेश जोशी यांच्याकडे त्यांनी सदशग्रंथ घनांत अध्ययन केलं. हे सर्व अध्ययन त्यांनी कष्टपूर्वक आणि उत्तमरीत्या पूर्ण केले आहे.''

यानंतर वे.मू. अथर्व पटवर्धन यांनी गुरुवर्यांचे आशीर्वाद घेऊन सरस्वतीपूजन करून घनपारायणास सुरुवात केली. वेदाभिमानी भाविकांना या घनपारायणाच्या श्रवणाचा लाभ सकाळी ७.३० ते १२.३० या वेळेत मोदी गणपती मंदिरात घेता येईल.



वे.मू. दिनकरभट्ट फडके, वे.मू. अथर्व पटवर्धन, वे.मू. वसंतराव फडके

**मालक, मुद्रक, प्रकाशक** : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे – २ येथे छापून श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, ९३७ डी, ज्ञानेश्वर पादुका चौकाजवळ, शिवाजीनगर, पुणे – ४११ ०१६ येथून प्रकाशित केले.
**संपादक** : श्री. विनायक चिंतामण पराडकर, अध्यक्ष, श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती सेवामंडळ, पुणे दूरभाष क्र.: ०२०–२५६५५०२१